नाशिक महानगरपालिका, नाशिक.
Rajeev Gandhi Bhavan, Sharanpur Road, (Post Box no.12), Nashik-422 002.
Visit us at : www.nmc.gov.in E-mail: dmc_lic@nmc.gov.in ph.no. 0253-2222476

जा. क्र.जापवि/कक्ष-१/६८० /२०२०
दिनांक :-०६/११ /२०२०
NMC/DTD/OWL/२०२०/

**परिपत्रक**

**विषय:- दिपावली उत्सव -२०२० मार्गदर्शक सूचना**

**संदर्भ** :-१. इकडील कार्यालयाकडील जाक्र/जापवि/ कक्ष-१/६४५/२०२० दि.२६/१०/२०२० अन्वयेचे परिपत्रक
२. इकडील कार्यालयाकडील जाक्र/जापवि/ कक्ष-१/६५२/२०२० दि.२७/१०/२०२०
३. मा. मुख्य सचिव , महसूल व वन , आपत्ती व्यवस्थापन , मदत व पुनर्वसन, महाराष्ट्र राज्य यांचेकडील आदेश क्र.DMU/२०२०/ CR-९२/DisM-१ दि.२९/१०/२०२०
४.मा. जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, नाशिक यांचेकडील - क्र. कक्ष/कोरोना विषाणू/५१२/२०२० दि.२९/१०/२०२०
५.मा.उपसचिव, गृह विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील क्र.आरएलपी-११२०/प्र.क्र.१८०/विशा १ दि.५ नोव्हेंबर,२०२० चे परिपत्रक.

शासनाने कोरोना विषाणुचा (COVID-१९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा. १८९७ दिनांक १३ मार्च, २०२० पासून लागू करुन खंड २, ३ व ४ मधील तरतुदीनुसार अधिसूचना निर्गमित केलेली आहे. सदर अधिसूचनेनुसार प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी क्षेत्र प्रतिबंधित करण्याकरीता महानगरपालिका आयुक्त यांना सक्षम प्राधिकारी म्हणून प्राधिकृत करण्यात आलेले आहे.

कोविड-१९ विषाणूच्या संसर्गाचा प्रादुर्भाव झपाटयाने वाढत असल्याने आपत्कालीन उपाययोजनेचा भाग म्हणून मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्याचे क्षेत्रात लॉकडाऊन (Lockdown) ची घोषणा यापूर्वी केलेली असून तसेच टप्पेनिहाय लॉकडाऊन समाप्त करणे आणि निर्वंध कमी करण्यासाठी **मिशन बिगीन अगेन** (MISSION BIGIN AGAIN ) बाबत अधिसूचना जाहीर केलेली आहे. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांनी संदर्भिय क्र.३ मधील दि.२९/१०/२०२० रोजीच्या आदेशान्वये **मिशन बिगीन अगेन** अंतर्गत दि.३१ ऑक्टॉबर,२०२० पर्यंत महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी दिलेली मार्गदर्शक तत्वे व परिशिष्ट १,२ व ३ मध्ये नमूद केलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करणेकामी शासन अधिसूचना जारी करण्यात आलेली आहे. त्यातील अटी व शर्तीनुसार दि. ३० नोव्हेंबर, २०२० पावेतो टप्पा क्र. ५ प्रमाणे लागू करण्यात आलेला आहे. सदर शासन अधिसूचना सुधारणा संदर्भिय क्र.४ अन्वये नाशिक जिल्हा कार्यक्षेत्रात लागू करणेत आलेली आहे.

कोविड-१९ मुळे उदभवलेल्या संसर्गजन्य परिस्थितीचा विचार करता या वर्षीचा दिपावली उत्सव साध्या पध्दतीने साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्या अनुषंगाने संदर्भिय क्र. ५ अन्वये शासनाने खालीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना दिलेल्या आहेत.

१. राज्यात तसेच मोठया शहरांमध्ये अद्यापही कोरोनाचे रुग्ण मोठया प्रमाणावर आढळून येत आहेत. चालू वर्षी कोविड या संसर्गजन्य रोगाचा झालेला प्रादुर्भाव विचारात घेऊन गेल्या सात आठ महिन्यात आलेले सर्व धर्मीय सण/ उत्सव अत्यंत साध्या पध्दतीने व लोकांनी एकत्रित न येता साजरे केले आहेत. या वर्षीचा दिपावली उत्सव कोविड कालावधीत साजऱ्या केलेल्या अन्य उत्सवांप्रमाणेच पूर्ण खबरदारी घेऊन अत्यंत साध्या पध्दतीने साजरा करावा.

२. कोविड संसर्गामूळे बंद करण्यात आलेली राज्यातील धार्मिक स्थळे अद्याप खुली करण्यात आलेली नाहीत. त्यामूळे साजरा केला जाणारा दिपावली उत्सव घरगुती स्वरुपात मर्यादित राहील याची दक्षता घेण्यात यावी. उत्सव कालावधीत नागरिकांनी विशेष करुन ज्येष्ठ नागरिक तसेच लहान बालके यांनी घराबाहेर पडण्याचे शक्यतो टाळावे. तसेच नागरिकांनी गर्दी टाळावी व मोठया प्रमाणात एकत्रित येऊ नये. मास्कचा वापर आणि सोशल डिस्टन्सींगचे पालन करावे, जेणेकरुन कोरोनाचा संसर्ग / संक्रमण वाढणार नाही.

Scanned by CamScanner

३. दिपावली हा दिव्यांचा तसेच प्रकाशाचा उत्सव मानला जातो. या उत्सवा दरम्यान दरवर्षी मोठया प्रमाणावर फटाक्यांची आतषबाजी करण्यात येते. त्यामूळे वायु व ध्वनी प्रदुषणाची पातळी वाढून जनसामान्यांच्या तसेच प्राणीमात्रांच्या आरोग्यावर होणारे विपरीत परिणाम दिपावली उत्सवानंतर बराच कालावधीपर्यंत दिसून येतात. कोरोना आजारामूळे परिणाम झालेल्या अनेकांना फटाक्यांच्या धुरामूळे वायु प्रदुषणाचा थेट परिणाम होऊन त्रास होण्याची भीती आहे. ही बाब विचारात घेऊन नागरिकांनी चालू वर्षी फटाके फोडण्याचे टाळावे, त्याचा त्रास होऊ शकतो. त्याऐवजी दिव्यांची आरास मोठया प्रमाणावर करुन उत्सव साजरा करावा.

४. या उत्सवादरम्यान कोणत्याही प्रकारचे सार्वजनिक उपक्रम/ कार्यक्रम उदा. दिपावली पहाट आयोजित करण्यात येऊ नयेत. आयोजित करावयाची झाल्यास Online, केबल नेटवर्क, फेसबुक इत्यादी माध्यमाव्दारे त्याचे प्रसारण करावे.

५. सांस्कृतिक कार्यक्रमांऐवजी आरोग्य विषयक उपक्रम/ शिबीरे (उदा.रक्तदान) आयोजित करण्यास प्राधान्य देण्यात यावे आणि त्याव्दारे कोरोना, मलेरिया, डेंग्यु इ. आजार आणि त्यांचे प्रतिबंधात्मक उपाय तसेच स्वच्छता याबाबत जनजागृती करण्यात यावी. मात्र त्या ठिकाणी देखील लोकांनी एकाच वेळी मोठया प्रमाणावर एकत्रित येऊ नये याची दक्षता घेण्यात यावी.

६. कोविड -१९ चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना अंतर्गत दिपावली सण उत्सवामध्ये नियमांचे पालन करणेकामी संदर्भिय क्र. ४ व ५ चे परिपत्रक/ सूचनांमध्ये विहीत केलेल्या नियमांचे अनुपालन करणे बंधनकारक राहील. तसेच या परिपत्रकांनतर व प्रत्यक्ष उत्सव सुरु होण्याच्या मधल्या कालावधीत काही सूचना नव्याने प्रसिध्द झाल्यास त्यांचे देखील अनुपालन करावे.

शहरामध्ये दिपावली सण उत्सव कालावधीत कोरोना विषाणू (COVID-१९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना अंतर्गत वरील आदेश/ सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्याची व त्यास व्यापक स्वरुपात प्रसिध्दी देणेची जबाबदारी सर्व संबंधितांची राहील.

सदरचे परिपत्रक मनपा संकेतस्थळ www.nmc.gov.in वर प्रसिध्द करणेत यावे

०६/११/२०२०

(कैलास जाधव)
आयुक्त
नाशिक महानगरपालिका, नाशिक

**प्रत माहितीसाठी / उचित कार्यवाहीस्तव :**

अ) मा. जिल्हाधिकारी,नाशिक तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,नाशिक
आ) मा. पोलीस आयुक्त,नाशिक शहर
इ) मा. महापौर, मा. उपमहापौर नाशिक महानगरपालिका,नाशिक
ई) मा. सभागृह नेता / मा. विरोधी पक्षनेता / मा. सर्व पक्षीय गटनेते , नाशिक महानगरपालिका, नाशिक
उ) मा. सभापती, (सर्व समित्यांचे ) नाशिक महानगरपालिका,नाशिक

**प्रत कार्यवाहीसाठी :**

१. सर्व विभागीय अधिकारी, नाशिक महानगरपालिका, नाशिक
२. सर्व विभागप्रमुख, नाशिक महानगरपालिका, नाशिक
३. जनसंपर्क अधिकारी, नाशिक महानगरपालिका , नाशिक

Scanned by CamScanner